IMPACT FACTOR SJIF 2019-6.380

ISSN 2319-4766

SRJIS

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Special Issue of

An International, Peer Reviewed & Referred

## SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

JAN-MAR,2020,V-8/45

**Editor-In-Chief**

Prin. Dr. G. N. Shinde

**Editor**

Dr. P. R. Muthe

**Co-Editors**

Dr. D. D. Bhosale

Dr. D. A. Pupalwad



SJIF 2019 = 6.380
ONLINE ISSN 2278-8808 PRINTED ISSN 2319-4766

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly
Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**JAN-MAR, 2020, VOL-8, ISSUE-45**


1 जागतिकीकरणानंतर मराठवाड्यातील स्टेट बँक ऑफ इंडियाची प्रगती 1-9
*डॉ. अनिल बनकर*

2 भारतातील आर्थिक सुधारणा : कारणे व परीणाम 10-15
*डॉ. सोनाजी एस. पतंगे व प्रा. सुनिल गणेशराव पाटील*

3 जागतिकीकरणातील भारतीय दारिद्र्याचा तुलनात्मक अभ्यास 16-21
*अंजली शिवाजी खरपुडे व प्रा. डॉ. माधव मुरहारी गायकवाड*

4 जागतिकीकरणाचा भारतीय कृषिवरील परिणाम 22-26
*प्रा. डॉ. मुंडकर एस.एम.*

5 कृषीव्यवसायात जगतिकीकरणाचे परिणाम 27-30
*डॉ. सुरेश डी.सामाले*

6 जागतिकीकरण आणि महाराष्ट्रातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक 31-35
*प्रा.डॉ.शेळके मदन लक्ष्मण*

7 जगतिकीकरण : भारताच्या औद्योगिक विकासाचा प्रश्न आणि उपाययोजना 36-39
*डॉ. ए. एस. नलवडे*

8 जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेतील बँकींग व वित्तीय क्षेत्रातील सुधारणा 40-45
*डॉ. यादव सुभाष रामराव*

9 जागतिकीकरण आणि शेतकरी आत्महत्या 46-50
*प्रा.एन.व्ही.कांबळे*

10 जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम 51-56
*प्रा.डॉ.एल.एच.पाटील व प्रा.सुकुमार दत्ता पाटील*

11 भारतातील कृषी उत्पादन खर्च आणि कृषी उत्पादकतेवरिल जागतिकीकरणाचे परिणाम 57-62
प्रा. डॉ. मगर डी.के.

12 जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था 63-66
*प्रा. डॉ. एल. एच. पाटील व प्रा. नेलवाडे महेश शिवाजीराव*

| | | |
|---|---|---|
| 29 | जागतिकीकरण आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>उपघटक : जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम<br>*पाटील स्वप्नील माधवराव* | 147-151 |
| 30 | जागतिकीकरण आणि भारतीय अर्थव्यवस्था<br>*प्रा. डॉ. मोहोकार एच.एस.* | 152-155 |
| 31 | जागतिकीकरणानंतर मराठवाडयातील कृषी अर्थव्यवस्था आणि मत्स्य उत्पादनाची स्थिती<br>*प्रा. एल.एस.सिताफुले* | 156-160 |
| 32 | जगतिकीकरणाचे ई–कॉमर्स वरील परिणाम<br>*प्रा. डॉ. पवार बी. एस.* | 161-163 |
| 33 | जागतिकीकरणाचा आंध आदिवासी जमातीवर पडलेल्या प्रभावाचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>*श्री. आकोशकर ई.उ.* | 164-169 |
| 34 | जागतिकीकरणाचा भारतातील उपभोक्त्यावर झालेला परिणाम – एक अभ्यास'<br>*प्रा. डॉ. बालाजी आ. साबळे* | 170-172 |
| 35 | शेतक–यांच्या आत्महत्या : एक सामाजिक व आर्थिक विपन्नावस्था<br>*प्रा. डॉ. नानासाहेब पाटील* | 173-175 |
| 36 | जगतिकीकरण आणि भारतीय शेती<br>*कु. शीतल ढाणेकर* | 176-179 |
| 37 | जागतिकीकरण आणि ग्रामीण विकास<br>*प्रा.डॉ. बी. एम. कांबळे* | 180-183 |
| 38 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम : एक चिंतन<br>*प्रा. डॉ. गाडेकर बी. पी.* | 184-188 |
| 39 | जागतिकीकरणा नंतरच्या शेतकरी आत्महत्या – एक सामाजिक समस्या<br>*प्रा. डॉ. चव्हाण एस.जी.* | 189-192 |
| 40 | जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवन आणि शेती संस्कृतीवरील प्रभाव<br>*प्रा. डॉ. राधदिनेवार गोविंद शंकरराव* | 193-199 |

ISSN: 2319-4766

# जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणाम :एक चिंतन

प्रा. डॉ. गाडेकर बी.पी.

*विभागप्रमुख व सहायक प्राध्यापक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर*

gadekarbp@gmail.com

**प्रस्तावना :.**

स्वतंत्र भारताने देशाच्या आर्थिक विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केलेला होता. त्याला नियोजनाची जोड देवून सामाजिक न्यायासह समतोल असा आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेलेला आढळतो. भारताला त्यानुसार काही अंशी यशही मिळाले; परंतू त्यात बऱ्याच उणिवा आढळुन आल्याचे दिसून येते.

वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, दारिद्रय, प्रादेशिक असमतोल, अल्प दरडोई उत्पन्न, भांडवलाचा अभाव तसेच परकीय व्यापारातील ऋणात्मक दिशेने होणारी वाढ, परकिय गंगाजळीतील घटता प्रवाह, परकीय कर्जाचा वाढता भार, रुपयाची अपरिवर्तनियता तसेच विशिष्ट परकिय देशांसोबतच असलेले आर्थिक संबंध इत्यादी कारणामुळे आर्थिक विकासाच्या अपेक्षित यशाचे लक्षापर्यंत पोहचू शकलेलो नाही.

त्यामुळे भारताचा विकासदर सतत सरकता (मागे–पुढे होणारा) होता. या कठीण पेचप्रसंगातून अर्थव्यवस्थेस बाहेर काढण्याकरिता निर्णयात्मक असे धोरणात्मक बदल घडवून आणण्याची नितांत आवश्यकता भासू लागली, त्यासंबंधी सर्वच स्तरातून विचार मंथन सुरु झाले. अशा परिस्थितीत तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी २४ जूलै, १९९१ रोजी नविन आर्थिक धोरणाचा स्विकार केला यालाच 'राव–मोहन' प्रतिमान म्हटले जाते, या प्रतिमानानुसार नेहरु प्रतिमानाने स्विकारलेल्या 'मिश्र–अर्थव्यवस्थेचा त्याग करुन नविन आर्थिक धोरणाचा स्विकार केल्याचे स्पष्ट होते.

त्यानूसार आपली अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडून घेण्यासाठी 'खाउजा' (एल.पी.जी.) धोरणाचा पुरस्कार केल्याचे दिसुन येते. 'खाउजा' धोरणाला आज साधारणतः २५ वर्ष पूर्ण झालेली दिसून येतात. या दृष्टीने या धोरणातील खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या संकल्पनेपैकी प्रस्तुत शोधनिबंधात प्रामुख्याने जागतिकीकरणाचा अर्थ, आवश्यकता व भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणामाचा विविधांगाने परामर्श घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :–**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या विश्लेषणाकरिता संशोधकाने पुढीलप्रमाणे महत्वपूर्ण उद्दिष्टांची निश्चिती केलेली आहे.

१) नविन आर्थिक धोरणाची आवश्यकता व पार्श्वभूमी अभ्यासने.

२) जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.

३) जागतिकीकरणाचे भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणामाचे मूल्यमापन करणे

**गृहित कृत्ये :–**

सदरील शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये पडताळून पाहण्यासाठी संशोधकाने खालील प्रमाणे गृहितकाची निवड केलेली आहे.

ISSN: 2319-4766

१)जागतीकीकरणाने कृषी अर्थव्यवस्थेच्या विकासात आभासी वाढ झाली.

२)जागतिकीकरणाने भारतीय 'स्वावलंबनास' धोका निर्माण झाला.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने उपरोक्त उद्दीष्टांची पूर्तता व गृहीतकांची पडताळणी करण्यासाठी सदरील संशोधकाने अन्वेषणात्मक विश्लेषण पद्धतीचा अधिक प्रमाणात आधार घेतलेला आहे. त्याकरीता द्वितीय आधार सामग्रीचा उपयोग करुन संबंधीत प्रश्नाची उकल करण्यासाठी संशोधकाने शास्त्रीय संशोधन पद्धतीच्या तत्वावर अधिक भर दिलेला आहे.

**जागतिकीकरणाची आवश्यकता :—**

जगातील आनंद दारिद्र्याचा अभाव, विषमता, निरक्षरता, कुपोषण, रोगराईचा अभाव, आरोग्याचे रक्षण हे जागतिकीकरणाने सहज साध्य करता येते असे जागतिकीकरणाच्या पुरस्कारकर्त्यांचे (के.एस. कृष्णमूर्ती) मत असल्याचे आढळते. या अनुषंगाने विचार केल्यास मानवाच्या अनेक समस्या या आर्थिक स्वरुपाच्या आहेत, त्याकरिता जागतिकीकरणाची आवश्यकता असलेली दिसून येते. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील आर्थिक पुर्नउभारणी व विकासाकरीता अनेक संघटना करार करुन निर्माण झाल्या.

बड्या देशांनी त्यातूनच छोट्या मोठ्या देशांना, प्रलोभने, अमिष व आर्थिक कोंडी करण्याची भिती दाखवून जागतीकीकरणाच्या प्रक्रियेत सामावून (ओढवून) घेतले, त्यात भारतही अपवाद राहू शकलेला नाही हे महत्वाचे आहे.

त्यामूळे आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF), जागतिक बॅंक, व्यापार आणि जकात यावाबतचा बहुराष्ट्रीय 'डंकेल करार' (GATT) यांच्या आदेशांचे पालन भारतासारख्या सभासद राष्ट्रांना करणे बंधनकारक बनलेले आढळते.

भारतीय विचारवंतांनी, प्रशासकांनी व राज्यकर्त्यांनी जागतिकीकरणाच्या मर्यादा व संभाव्य परिणामांचा आढावा घेवून जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेद्वारे भारतास तत्कालीन आर्थिक अरिष्टातून बाहेर पडण्याकरिता जगातील बड्या देशांची मदत, जागतीक बॅंकेची मदत, विदेशी वित्तिय संस्थाची मदत घेवून संभाव्य गुंतवणूकीत वाढ झाल्यास भारताचा आशियाई आणि इतर राष्ट्रांच्या तुलनेत अत्यंत कमी असलेला आर्थिक विकासाचा दर वाढविण्यास मदत होईल, भारतात प्रशिक्षीत कामगार, उच्च श्रेणीचे तंत्रज्ञान, संशोधकाच्या उपयुक्त ज्ञानाने भारतातील विपूल ज्ञानसाठा व खनिजसाठ्याचा पर्याप्त उपयोग करण्यासाठी,

जागतिकीकरणाकडे रोजगार वाढीच्या लाभाचा फायदा घेण्याच्या दृष्टीने जागतीकीकरणाची आवश्यकता उधृक्त केलेली असल्याचे आढळून येते.

**जागतिकीकरणाचा अर्थ :—**

जागतिकीकरण ही संकल्पना समाजाच्या व मानवी जीवनाच्या सर्व आयामांना स्पर्श करणारी आहे.

या अनुषंगाने विचार केल्यास जागतिकीकरणाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला जातो.

**१) डॉ. कैरोच्या मते :—**

"जागतिकीकरण ही सामाजिक प्रक्रियेची एक गुंतागुंतीची वेब आहे,

जी जगभरातील आर्थिक, सांस्कृतीक, राजकीय आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि संपर्क अधिक तीव्र करते आणि विस्तृत करते."

**२) आंतरराष्ट्रीय नाणे निधी :—**

"जागतिकीकरण म्हणजे वस्तू आणि सेवांमध्ये आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या प्रवाहातील वाढते प्रमाण आणि सिमापार व्यवहाराद्वारे व तंत्रज्ञानाच्या अधिक वेगवान आणि व्यापक प्रसाराद्वारे जगभरातील देशांचे वाढते आर्थिक परस्परावलंबित्व होय."

३) जागतिक बँक :—

"जागतिकीकरण म्हणजे उपभोग्य वस्तुंसह सर्व वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध हळू हळू कमी करणे, आयातीचे दर (कर) कमी करणे व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण होय."

४) एशियन डेव्हलपमेन्ट आउटलूक रिपोर्टनुसार :—

"दुसऱ्या महायुद्धांनंतर आर्थिक आणि अधिकतेपेक्षा अधिकत्तर तंत्रविद्यात्मक सामाजिक व राजकीय स्वरुपाचे जगाचे एकत्रिकरण म्हणजे जागतिकीकरण होय"

५) "जगातील सर्व देशांची जागतिक बाजारपेठ निर्माण करण्यासाठी सर्व देशांची एकच जागतिक बाजार व्यवस्था अस्तित्वात आणने म्हणजे जागतिकीकरण होय." कारण जागतिकीकरणामूळे व्यवसाय, उद्योग, व्यापाराचा वाढत जाणारा विस्तार की, ज्याला कोणत्याही देशाच्या भौगोलीक सीमा रेषांची मर्यादा राहत नाही.

थोडक्यात, सर्व राष्ट्रांची एकच सामाईक अशी मोठी बाजारपेठ निर्माण होण्यासाठी प्रत्येक देशाने वस्तू—सेवा, भांडवल व तंत्रज्ञान तसेच आताच्या गतीशीलतेवरील बंधने शिथील किंवा नष्ट करुन आपला व्यापार आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा बनविणे व आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही जागतीक अर्थव्यवस्थेशी जोडणे म्हणजे जागतीकीकरण होय. असा ध्वनितार्थ उपरोक्त विश्लेषणावरुन निघताना आढळतो.

वरील सर्व व्याख्यांचा परमार्श घेतल्यास जागतिकीकरणाची काही ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. जसे व्यापारावरील निर्बंध कमी करणे जेणेकरुन वस्तूंचे सर्व देशांमध्ये सहजपणे दळणवळण होईल; अशी परिस्थिती निर्माण करणे ज्यात विविध देशांतील भांडवल प्रवाही स्वरुपात राहील, त्यासाठी अशा वातावरणाची निर्मिती करणे की, जेथे आधुनिक तंत्रज्ञान सहजपणे प्रवाही होईल. तसेच जगातील देशांत श्रमीकांची गतिशीलता वाढण्यास पोषक वातावरणाची निर्मिती होईल.

जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम :—

जागतिकीकरणाचा सर्वात मोठा परिणाम हा भारतीय शेती क्षेत्रावर झालेला आहे. वास्तविक पाहता आंतरराष्ट्रीय व्यापार सुरळीतपणे चालावा या करीता सन १९४८ मध्ये गॅट ची स्थापना करण्यात आली.

परंतू १९९१ साली जागतिकीकरणाचे वारे खऱ्या अर्थाने भारतात सुरु झाले. त्यावेळचे गॅट चे संचालक 'ऑर्थर डंकेल' यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारसंबंधी ज्या नविन प्रस्तावातील शेती संबंधीची अनेक धोरणे भारतासही स्विकारणे अपरिहार्य ठरले, त्याचे दूरगामी परिणाम कृषी क्षेत्रावर झालेले दिसून येतात. त्यात,

१) शेतमालाच्या आयातीवरील राशी निर्बंध दूर करणे आणि आयात कर कमी करणे.

२) सूक्ष्म जिवांवरील पेटंट व

३) सूक्ष्म जीवशास्त्रीय पेटंटच्या प्रक्रियांचा परिणाम भारतीय शेती व शेतकऱ्यांवर अधिक झाल्याचे आढळतात.

आयातीवरील सर्व संख्यात्मक निर्बंध दूर करण्याच्या धोरणांचा एक भाग म्हणून भारताने सन १९९१ पासून आयातीवरील संख्यात्मक निर्बंध उठविण्यास सुरुवात केली. त्यात सन १९९५—९६ साली ६१६१ वस्तूंच्या आयातीवरील निर्बंध कमी केली गेली. त्यानंतर १९९६—९७ साली ४४८, तर १९९७—९८ साली ३८१, १९९८—९९ साली ८९४ अशाप्रकारे जवळपास १७६३ वस्तूंची आयात संपूर्णपणे खूली करण्यात आली.

याच कराराचा भाग म्हणून २००१ साली पून्हा ७१५ वस्तूंवरील निर्बंधने आणि कर कमी केल्यामूळे विदेशी कृषी माल व वस्तूंची आयात प्रचंड प्रमाणात वाढून भारतीय बाजारातून स्वदेशी शेतकऱ्यांना बाहेर फेकले गेले.

परिणामी शेतकऱ्यांपुढे इतर अनेक जटील प्रश्नांची साखळी उभी राहीली, त्याचे विपरित

म्हणजे भारतीय शेतकरी आत्महत्येचा निवडण्यापर्यंतची पावले उचलेली दिसून

जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीकडे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेत केला. यात अमेरिकेतील कारगिल बेजो शीतल शीड्स, सॅडोज, अर, ओव्हरसाईज कार्पोरेशन, आय.टी. ॲग्रोटेक हिंदूस्तान लिव्हर यासारख्या य कंपन्यांनी (MNCs) शेतीकरीता बि–बीयाणे बाजारात आणली.

त्यांची आर्थिक स्थिती प्रचंड असल्याने द्वारे भारतासारख्या अल्पविकसीत लोकप्रतिनिधी व शासनकर्त्यांना प्रभावाखाली ठेवण्याचा प्रयत्न सरकारी धोरणे त्यांनाच अनुकूल आढळून येते.

त्याचेच परिणाम म्हणून अमेरीकेतील आणि कारगील ह्या बलाढ्य कंपन्यांनी व गुजरात सरकार बरोबर करार केले, करारांप्रमाणे ते आता येथील ांबरोबर कंत्राटी पद्धतीने शेती करतील पढे भारतीय शेती व शेतकरी उद्वस्त ीच ही पावले असल्याचे स्पष्ट होते.

'ऑर्थर डंकेल' प्रस्तावानुसार भारतात आयातीबरोबर शेती उत्पादनावीरल त कपात केली पाहीजे असे बंधन ने भारतीय कृषी व शेतकरी अत्यंत अरिष्टात सापडलेले आहेत मूळात राष्ट्रातील शेती व शेतकऱ्यांस प्रचंड अनुदान दिले जातात.

पान – ७५ टक्के, युरोप – ४५ कॅनडा – ४८ टक्के तर अमेरीका – के पर्यंत प्रचंड अनुदान देतात.

भारतीय शेती व शेतकऱ्यांस मिळणारे अत्यंत तुटपूंजे म्हणजे केवळ १३ नुदान दिल्याचे आढळते.

परिस्थितीत विदेशी शेतीतील उत्पादन तुलनेने कमी असल्याने भारतीय उत अशा मालाला मोठी मागणी वाढते आहे. त्यामुळे भारतीय शेती व शेतकऱ्यांची कंबरडे मोडकळीस आल्याचे स्पष्ट होते. याशिवाय उपरोक्त करारानुसार भारताने दर वर्षी एकूण कृषी उत्पादनाच्या २ टक्के कृषी आयात करणे बंधनकारक असल्याने भारतीय उत्पादीत कृषी माल साठे मोठ्या प्रमाणात पडून राहीलेले दिसून येतात.

त्याचा अप्रत्यक्ष परिणाम हा सार्वजनिक वितरण प्रणालीवर होवून आज ती मोडकळीस आल्याचे आढळते. यावरुन थोडक्यात असे निरिक्षणास येते की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय शेतीच्या मुळ प्रश्नांना स्थान दिलेले नाही. पाण्याची व्यवस्था, उत्तम बियाणे, कर्जपूरवठा, शेती मालाची साठवणूक, वाहतूक व विक्री व्यवस्था, किफायतशीर हमी भाव, कोरडवाहू शेतीचे प्रश्न, पडीक जमीनीचे प्रश्न अशा शेतीसंबंधीच्या समस्या सोडविण्याच्या उद्देशाने स्विकारलेले जागतिकीकरण हे वास्तवात जागतिकीकरणामूळे ह्या समस्यांच्या स्वरुपाची तीव्रता अधिक जटील बनल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे भारतीय शेती व अर्थव्यवस्था कोलमडून पडण्याची भीती वर्तविली जाते. त्यास उपरोक्त विवेचन पुष्टी देत असल्याचे लक्षात येते.

म्हणून कृषी व पर्यायाने भारतीय शेतीचा विचार आशावादी भूमीकेतून सर्व स्तरावर साकल्याने करणे आवश्यक वाटते.

**सारांश :–**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत माणसाऐवजी वस्तु मोठी होत आहे. सर्व जग नफा तोट्याच्या बाजारात उभे आहे. विशिष्ट लोक सतत श्रीमंत आणि बाकीचे गरीब होत आहेत. मानवी समूहाला जागतिकीकरणाने स्वातंत्र्य, समता, कल्याणकारी शासन, अडथळाहीन जग यासारखी अनेक आश्वासने दिली; पण ती सारीच्या सारी वांझ ठरली. पृथ्वीवरचा माणूस कधी नव्हे एवढा सर्वच अर्थाने असुरक्षित झालेला आहे. या पार्श्वभूमी आधारे चिंतन केल्यास स्पष्ट होते की, आधुनिक

काळात माहीती तंत्रज्ञानामूळे जग लहान झालेले आहे.

अलीकडील काही वर्षात भारतासह जगातील अनेक राष्ट्रांत उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतीकीकरण यांच्या संदर्भाने विचारमंथन चालू आहे. सन १९९४ मध्ये 'उरुग्वे' येथे राष्ट्राराष्ट्रांतील व्यापारविषयक वाटाघाटी पूर्ण झाल्यावर १९९५ मध्ये जागतिक व्यापार संघटना (WTO – World Trade Organization) ची स्थापना करण्यात आली. यामध्ये भारतही सामील झाल्याचे आढळून येते. या अनुषंगाने येणारे जागतीक बदल स्विकारणे भारतास अपरिहार्य ठरलेले दिसून येते.

त्याचे सखोल परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले आढळतात. त्यापैकी अधिक विपरीत परिणाम भारतीय शेती व शेती आधारीत उद्योगावर अधिक ठळकपणे झाल्याचे आढळतात.

**संदर्भ ग्रंथ :—**

*१) ब्रम्हे सुलभा (२००१), भारतीय संदर्भात जागतिकीकरण, सप्रप, जाने. ते मार्च.*

*२) नीरज (२००२), जागतिकीकरण की नवी गुलामगीरी, पुणे.*

*३)खातू गजानन (२००१), जागतिकीकरण परिणाम आणि पर्याय, अक्षर प्रकाशन, मुंबई.*

*४)कांबळे उत्तम (२००१), जागतिकीकरणाची अरिष्टे, (संपा), कोल्हापूर.*

*५) खरे सी.पी. (२००२), जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे.*

*६)कराडे जगन (२०१३), जागतिकीकरणाची भारतीय अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने, डायमंड प्रकाशन, पूणे.*

*७) किरणजी देसले (२०१४), भारतीय अर्थव्यवस्था, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव.*